## निशाणी क्रमांक ११७ खालील आदेश.

प्रतिवादी क्र.२ (ब) हिने प्रस्तूतचा अर्ज तिच्या विरुध्द झालेला विना कैफियत चौकशी आदेश झालेला नसल्यामुळे कैफियत दाखल करुन घेण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादीचे थोडक्यात कथन की, दि.०८.११.२०२४ रोजी तिला न्यायालयाचे समन्स प्राप्त झाल्यानंतर प्रकृती बरी नसल्यामुळे न्यायालयात हजर होऊ शकली नव्हती. तसेच त्यानंतर वकिलांना भेटून विहित मुदतीत लेखी कैफियत सादर करु शकलेली नाही. त्यामुळे तिच्या विरोधात विनाकैफियत चौकशी आदेश झालेला नसल्यामुळे कैफियत पटलावरती घेण्याची विनंती केली आहे.

२. वादीच्या विधिज्ञांनी अर्जाच्या शेवटच्या पानावर लेखी म्हणणे देऊन, प्रतिवादीने तिच्या कथनांच्या पृष्ठतेसाठी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नसून जाणून–बुजून पाच महिन्यांच्या विलंबाने अर्ज केलेला असल्यामुळे नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी व वादीच्या वकिलांचा विस्तृत युक्तिवाद ऐकला. प्रतिवादीच्या वकिलांनी प्रस्तूत अर्जाद्वारे न्यायाच्या दृष्टीने विलंब माफ करुन लेखी कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्याची विनंती केली आहे. याउलट, वादीच्या वकिलांनी प्रतिवादीने जवळपास पाच महिन्यांच्या विलंबाच्या उशिराने कोणत्याही कारणाशिवाय अर्ज दिलेला असल्यामुळे नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादीच्या वकिलांच्या मदतीने अभिलेखाचे अवलोकन केले. सदर प्रतिवादीला दाव्याची आदेशिका प्राप्त झाल्यानंतरही तीने मुदतीत लेखी कैफियत दिलेली नाही. त्यामुळे दि.२०.०२.२०२५ रोजी तिच्या विरोधात एकतर्फा आदेश पारीत झालेला आहे. प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे तिच्या विरोधात विनाकैफियत आदेश झालेला नाही. परंतु सदरचा दावा हा तिच्या विरोधात एकतर्फा चालवण्यात येत आहे. त्यामुळे प्रस्तूत अर्ज हा दि.प्र.सं आदेश ९ च्या तरतूदी अंतर्गत विचारात

घेणे गरजेचे आहे.

**५**. प्रतिवादीने दि.०८.११.२०२४ रोजी तिला दाव्याच्या आदेशिका मिळाल्याचे मान्य केलेले आहे. यावरुन तिला नियमाप्रमाणे आदेशिका मिळून देखील ती सदर प्रकरणात हजर झालेली नाही. तीने तिच्या आजारपणाचे कारण दिलेले असून त्याबाबतचा कोणताही पुरावा दिलेला नाही. त्यामुळे तीने अर्जात नमूद केलेले कारण संयुक्तिक वाटत नाही.

**६.** प्रस्तूत दावा हा हक्कज्ञापनासह निरंतर मनाई हुकूमासाठी असल्यामुळे प्रतिवादीला तिच्या बचावाची न्यायाच्या दृष्टीने संधी देणे आवश्यक आहे. प्रतिवादीने सदर अर्जासोबत लेखी कैफियतीची प्रत दाखल केलेली आहे. सदर प्रतीमध्ये लेखील जबाब हा तिच्यासह प्रतिवादी क्र.४ साठी दाखल करत असल्याचे नमूद केले आहे. परंतु, प्रतिवादी क्र.४ ची लेखी कैफियत नि. क्र.१९ प्रमाणे पटलावरती असून त्याने तो सज्ञान झाल्यानंतर स्वतंत्र कैफियत दाखल करण्याची मागणी केलेली नाही. त्यामुळे सर्व बाबींचा विचार करता, न्यायाच्या दृष्टीने मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

**<u>आदेश</u>**

**१**. प्रतिवादीचा अर्ज केवळ प्रतिवादी क्र.२ (ब) च्या हद्दीपुरता अंशतः मंजूर करण्यात येतो.

**२**. प्रतिवादी क्र.२ (ब) ने अर्जासोबत दाखल केलेली कैफियत स्विकारण्यात येऊन तिला नि. क्र.११९ देण्यात येतो.

**३**. वादी व प्रतिवादीने आदेशाची नोंद घ्यावी.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

**(आर. पी. थोरे)**

न्या. अ. सं. क्र. महा.०२८९७

दिनांक – १६.०६.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.